नि.मु.नं. ३२३/२०२२.
श्री.भूषण कृष्णा पाटील वि. गृप ग्रामपंचायत कसळखंड तर्फे सरपंच कसळखड व इतर.
**C.N.R. No.MHRG-04-006681-2022**

## नि. क्रं. ०५ वरील आदेश.

सदर अर्ज वादीने प्रतिवादी क्रं. ०१ व ०२ विरूध्द् दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये त्यांनी अगर त्यांचे नोकरचाकर, प्रतिनिधी किंवा अन्य त्रयस्थ व्यक्ती मार्फत वादीने दावा मिळकतीवर उभारलेले घर व हॉटेल अंतिम निकाल होईपर्यंत तोडण्याबाबत कोणतीही कारवाई करू नये म्हणून तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्यासाठी केलेला आहे.

०२. यात वादीची थोडक्यात हकिकत अशी की, दावा मिळकत मौजे कळसखंड, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील गावठान हददीतील घर मिळकत ६२९ असून त्याचे क्षेत्रफळ १५६० आहे व त्याचे सविस्तर वर्णन अर्ज कलम ०१ मध्ये दिलेले आहे. सदर घर मिळकत बांध्काम करण्याकरीता वादीचे वडिलांनी प्रतिवादी क्रं. ०१ व ०२ यांना बांधकामाबाबत दि. २५/०१/१९९४ रोजी पत्र दिले होते व त्यास त्याबाबत परवानगी प्रतिवादी क्रं. ०१ व ०२ यांनी दिली होती. सन १९९४ पासून सदर दावा मिळकत वादीचे कब्जा वहीवाटीत होती व आहे. वादींच्या आईवडिलांचे उत्पन्न कमी असल्याने त्या ठिकाणी त्यांनी घर अधिक छोटेसे खानावळ स्वरुपाचे हॉटेल सुरु करण्याचे ठरविले. त्या

प्रमाणे वादी क्रं. ०१ यांना जेवण खानावळ स्वरुपाचे हॉटेल चालू करण्याची परवानगी दिली होती व त्या ठिकाणी वादी यांचे आईवडिल खानावळ स्वरुपाचे व्यवसाय करीत होते. प्रतिवादी क्रं. ०१ व ०२ यांनी दावा मिळकतीच्या संर्दभात वेळोवेळी वादीच्या लाभात बांधकाम परवानगी, विद्यूत मिटर घेण्याकरीता ना हरकत दाखला, ॲसेसमेन्ट व कर भरल्याच्या पावत्या दिलेल्या आहेत. अशी परिस्थिती असताना देखील, दि. २१/०९/२०२२ रोजी प्रतिवादी क्रं. ०२ यांनी वादीस नोटीस पाठवून स.क्रं. ८४/१ या जमीनीवर अनाधीकृत बांधकाम ताबडतोब काढून टाकावे अशी नोटीस केवळ राजकिय विरोधापोटी दिलेली आहे. करीता, सदरचा अर्ज देणे भाग पाडले.

३. प्रतिवादी क्रं. ०१ व ०२ यांनी नि. क्रं. १४ वर लेखी कैफियत दाखल करुन अर्जातील संपूर्ण मजकूर साफ नाकारलेला आहे. यात प्रतिवादींचे थोडक्यात म्हणणे असे की, वादींना सदरचा दावा दाखल करता येत नाही. जर वादींना प्रतिवादी यांनी ग्रामपंचायत अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार नोटीस दिलेली असेल तर सदर पत्राविरूध्द् वादींनी गटविकास अधिकारी पनवेल तथा स्टॅंडींग कमिटी, जिल्हा परिषद रायगड, यांच्याकडे त्याबाबत दाद मागुन स्थगीती घेणे गरजेचे आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही मौजे कळसखंड, तालुका पनवेल येथील गावठानमध्ये आहे असा दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाव्यासोबत दाखल केलेला नसल्याने वादींना मालकी हक्क नसल्या

कारणाने प्रतिवादींविरुध्द् दावा दाखल करुन कोणताही मनाई आदेश मागता येत नाही. दावा मिळकत घर नं. ६२९ ही कधीही वादीचे वडिल यांनी सन १९९४ साली अर्ज देवून रितसर बांधकाम बांधलेले नाही. वादीच्या वडिलांनी सन १९९४ साली दिलेला अर्ज हा मौजे कळसखंड येथील गुरुचरण जमीन मिळकत स.न. ३४ या मिळकतीमधील असून त्याचे घर क्रं. ४१५ असे आहे व ते आजही कृष्णा शंकर पाटील यांच्या नावाने ग्रामपंचायत दप्तरी नोंदलेले आहे. दाव्यातील घर मिळकत ६२९ हे वादी यांनी सन २००८–०९ च्या सुमारास बांधलेले असून सदर मिळकत ही मौजे आष्टे गुरुचरण स.न. ८४/१ या मिळकतीमध्ये आहे. वाद मिळकतीच्या चतुर्सिमा या पुर्णपणे चुकीच्या असून त्याच्या आजूबाजूस कोणतीही गावठान मिळकत नाही. सदर ठिकाणी पूर्णपणे गुरूचरण/गायरान सरकारी मिळकत आहे व सदर दावा घर मिळकत क्रं. ६२९ ही गावठान मिळकतीमध्ये नसून ती पूर्णपणे शासकिय जमीन मिळकतीमध्ये आहे व त्याची नोंद अतिक्रमीत मिळकत म्हणून आहे. वादी यांना गुरूचरण जमीन मिळकतीमध्ये घर बांधण्यासाठी प्रतिवादी क्रं. ०३ अगर तहसिलदार पनवेल यांनी कोणताही भुखंड दिलेला नाही व त्याबाबत कोणताही नजराना शासनास वादी यांनी दिलेले नाही. त्यामुळे ज्या स्थानीक स्वराज्य संस्थेच्या अधिकारक्षेत्रामध्ये जमीन मिळकतीवर बेकायदेशिर अतिक्रमणे केलेले असेल ते दुर करण्याचा पूर्णपणे हक्क व अधिकार आहे. अशा परिस्थितीत जमीन मिळकत स.न. ८४/१ ही मिळकत या प्रतिवादींच्या अधिकारक्षेत्रात येत असल्याने त्यांनी

ग्रामपंचायत अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे केलेली कारवाई ही पूर्णपणे व कायदेशिर आहे. वादी हे दावा मिळकतीचे मालक, हक्कदार नाहीत. करिता, अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली.

०४. वादी व प्रतिवादी यांचे वाद प्रतिवाद यांचे अवलोकन केल्यानंतर तसेच कागदपत्र व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुदद्े माझे विचारार्थ उपस्थित झाले. ज्याचे निष्कर्ष मी कारणासह विवेचन आदेशाच्या पुढील भागात देत आहे.

| अ.क्र | मुदद्े | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींस सकृत दर्शनी केस आहे का? | नाही. |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे का ? | नाही. |
| ३ | अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे का ? | नाही. |
| ४ | वादी मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाईहुकूम मिळण्यास पात्र आहे का? | नाही. |
| ५ | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुददा क्रं. ०१ ते ०४.**

५. वादी व प्रतिवादी यांनी सदर प्रकरणात काही कागदपत्र दाखल केलेले आहेत. त्याचा उहापोह योग्य त्या वेळी करण्यात येईल.

६. वादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत कळसखंड, तालुका पनवेल येथील घर नं. ६२९ असून ती मिळकत वादीच्या ताब्यात सन १९९४ पासून आहे. वादींना त्या जागेबाबत बांधकाम परवाना दिलेला आहे. त्या ठिकाणी वादीचे घर आहे. त्याचे क्षेत्रफळ १५६० चौ.फूट आहे. प्रतिवादी क्रं. ०१ व ०२ यांनी वादीकडून आवश्यक ती कागदपत्र घेतल्यानंतर बांधकाम परवाना दिलेला आहे. वादीच्या जागेवर त्याचा हॉटेल व्यवसाय आहे व त्यासाठी परवाना दिलेला आहे. वादीने अतिक्रमण केलेले नाही. केवळ राजकीय दबावापोटी वादीवर कारवाई करण्याचा प्रयत्नात प्रतिवादी आहेत. मोजणी नकाशात फक्त एकच घर दाखविलेले आहे. त्या मोजणीची नोटीस वादीला नाही. करिता, वादीचा अर्ज मंजुर करण्याची विनंती त्यांनी केली.

७. या उलट प्रतिवादींच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत घर क्रमांक ६२९ आहे. नि. क्रं. ४/१ मधील अर्ज हे वादीच्या वडिलांच्या नावे आहे. परंतू, दावा घर क्रमांक ६२९ ही मिळकत

वादीकडे कशी आली याचा उल्लेख नाही. सन १९९४ मध्ये जो परवाना दिलेला होता तो घर मिळकत क्रं. ४१५ साठी दिलेला आहे. घर मिळकत क्रं. ४१५ व ६२९ या मिळकती वेगवेगळया आहेत. नि. क्रं. ४/१ व ४/२ वरिल कागदपत्र घर क्रं. ४१५ बाबत आहेत. ते कागदपत्र घर क्रं. ६२९ बाबतचे नाहीत. नि. क्रं. १७/३ व १७/५ या असेसमेन्ट उता–यावर अतिक्रमण असा शिक्का आहे. नि. क्रं. १७/१ वर गट क्रं. ८४/१ ही मिळकत गुरुचरण जमीन म्हणून नोंद आहे. वादीने सरकारी जमीनीत घर बांधलेले आहे. वादीने दावा मिळकत गावठाण्यात आहे हे दर्शविणारा नकाशा दाखल केलेला नाही. वादी स्वच्छ हाताने आलेला नाही. वादीने स.क्रं. ८४/१ मध्ये अतिक्रमण केलेले आहे. ती मिळकत गुरूचरण मिळकत असून ती शासनाची मिळकत आहे. सदर मिळकत शासनाची असल्याने जिल्हाधीकारी किंवा तहसिलदार यांना अतिक्रमीत निष्कासित करण्याचे अधिकार आहेत. स्थानीक स्वराज्य संस्थांनाही तसे अधिकार आहेत. दि. ३०/०७/२०१६ रोजी प्रतिवादींनी जी नोटीस दिली होती ती अतिक्रमण काढून टाकण्याची नव्हती. ती नोटीस मालकी हक्काबाबत होती. वादीचे अतिक्रमण सरकारी जागेवर आहे. त्यामुळे त्यास कोणतेही संरक्षण देवू नये. करिता अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली.

८. वादीचे असे कथन आहे की, सन १९९४ मध्ये वादीच्या वडिलांनी प्रतिवादी क्रं. ०१ व ०२ यांच्याकडे बांधकामासाठी परवानगी मागीतली होती व त्यांनी दिली होती. परंतू, नि. क्रं. ४/१ वरिल दि.

२५/१/१९९४ रोजीचे अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तो अर्ज वादीच्या वडिलांनी ग्रुपग्रामपंचायत कसळखंड यांना दिली होती. त्या अर्जामध्ये घर क्रमांक नमुद नाही. त्यामुळे तो अर्ज दावा मिळकत ६२९ चाच होता असे म्हणता येत नाही. वादींनी नि. क्रं. ४/३ वर कराची पावती दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता दावा घर मिळकत ६२९ या मिळकतीवर वादीतर्फे सन २०२१–२२ ते सन २०२२–२३ या काळासाठी रू. ३३८२/– कर भरलेला आहे. नि. क्रं. ४/५ वरिल विज पुरवठा ना हरकत दाखल्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, दावा घर क्रमांक ६२९ मध्ये विजपुरवठा करण्यास ग्रामपंचायतीची हरकत नाही असा दाखला ग्रामसेवकाने दि. ६/७/२०१५ रोजी दिलेला आहे. नि. क्रं. ४/६ वरिल ग्रुपग्रामपंचायत कसळखंड यांचे दि. ३०/७/२०१५ रोजीच्या दाखल्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, ग्रामसेवक यांनी वादीस ग्रामपंचायत मिळकत क्रं. ६२९ मध्ये हॉटेल व्यवसाय करण्यास कोणतीही हरकत नाही असा दाखला दिलेला आहे.

९. नि. क्रं. ४/७ वरिल दि. ३०/७/२०१६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सरपंच व ग्रामसेवक, ग्रुपग्रामपंचायत कसळखड्ं यांनी वादीला सदर नोटीस देवून घर क्रं. ६२९ या जागेच्या मालकीहक्काचे कोणतेही कागदपत्र कार्यालयाकडे सादर केलेले नाहीत, तरी सदरचे मालकीहक्काचे कागदपत्र या

कार्यालयाकडे सदर नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांत सादर करण्याचे सुचविले होते. नि. क्रं. ४/८ वरिल वादीने दिलेल्या खुलासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यामध्ये त्यांनी सदर मिळकत त्यांच्या वडिलांच्या नावे किंवा त्याच्या नावे कश्या प्रकारे आलेली आहे हे नमुद केलेले नाही. नि. क्रं. ४/९ वरिल दि. २१/०९/२०२२ रोजीचे अंतिम नोटीसीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ग्रामसेवक व सरपंच यांनी वादीला नोटीस देवून सदर मिळकत क्रं. ६२९ बाबत मालकीहक्काचे पुरावे सादर केले नाहीत. त्यानुसार स.न. ८४/१ क्षेत्र ०–१४–०० चे दि. १५/१/२०१५ रोजी शासकिय मोजणी करण्यात आलेली आहे व दि. ३०/३/२०१८ रोजी हददी दाखविण्यात आल्या होत्या, त्यानुसार वादीने केलेले बांधकाम हे स.न. ८४/१ मध्ये आढळून आलेले असून ते अतिक्रमण केल्याचे सिध्द् झालेले आहे व सदरचे अतिक्रमण ३० दिवसाच्या आत काढून घेण्याचे वादीला सुचविले होते.

१०. नि. क्रं. १७/१ वरिल स.न. ८४/१ च्या सातबारा उता–याचे अवलोकन केले असता, ती मिळकत गुरूचरण म्हणून नोंद असून त्याचे क्षेत्र ०.१४.०० इतके आहे. नि. क्रं. १७/३ वरिल घर क्रं. ६२९ चे असेसमेन्ट उता–याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ती मिळकत वादी भुषण कृष्णा पाटील यांच्या नावे असून त्यामध्ये रकाना २० ते २७ मध्ये अतिक्रमण म्हणून शिक्का आहे. सदर कागदपत्रांवरून असे स्पष्ट दिसून येते की, स.न. ८४/१ ही मिळकत

गुरूचरण म्हणून नोंद असून ती शासनाची मिळकत आहे. नि. क्रं. १७/४ वरिल घर क्रं. ७५४ चे कर आकारणी नोंदवहीचे अवलोकन केले असता, ती मिळकत देखील अतिक्रमीत म्हणून दर्शविली आहे व ती वादीच्या नावे आहे. नि. क्रं. १७/५ वरिल घर क्रं. ४१५ ही मिळकत कृष्णा शंकर पाटील यांच्या नावे असून ती देखील अतिक्रमीत म्हणून दर्शविलेली आहे.

११. नि. क्रं. १७/६ वरिल मंडळ अधिकारी पोयंजे यांनी तहसिलदार पनवेल यांना दिलेल्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि. १५/३/२०१६ रोजी मंडळ अधिकारी यांनी तहसिलदार यांना त्यांनी समक्ष स्थळ पाहणी करून स.न. ८४/१ एकूण क्षेत्र ०–१४–०० हे. आर. ही जमीन ७/१२ ला कब्जेदार सदरी गुरूचरण म्हणून नमुद आहे, स.न. ४५/१ एकूण क्षेत्र २८–० हे.आर. ही जमीन सातबाराला गुरूचरण म्हणून नमुद आहे. स.न. ८२/१ या गुरूचरण जागेमध्ये श्री. अनंता पाटील यांनी धनश्री एंटरप्रायझेस या नावाने एक ऑफिस, हॉटेल व हॉटेलचे रूम व तसेच एक छोटे गॅरेजचे बांधकाम केलेले आहे व सदर व्यवसाय एका इमारतीत करण्यात येत असून सुमारे २५०० चौ.फूट जागेमध्ये दोन मजली इमारतीचे बांधकाम विनापरवाना करण्यात आलेले आहे व सदर शासकिय जमीनीवरील अतिक्रमण प्रतिबंधीत, निष्कातीत करणे, फिर्याद दाखल करणे इत्यादी काम संबधीत ग्रामसेवक व ग्रामपंचायतीची जबाबदारी असल्याने गटविकास अधिकारी, पंचायत समिती पनवेल व ग्रामसेवक, कसळखंड यांना आवश्यक ती

कारवाई करण्याचे कळविले आहे.

१२. वादीचे जरी दावा मिळकत ६२९ वर कब्जा असलातरी तो कब्जा अतिक्रमणाचा आहे. वादीने दावा मिळकत त्याच्या सकृतदर्शनी मालकीची असल्याबाबत कोणतीही नोंदणीकृत कागदपत्र दाखल केलेली नाहीत. वर्णन यादी क्रं. २४/१ ते २४/४ वरिल महा. शासन, महसूल व वनविभाग यांचे शासकिय जमीनीवरील अतिक्रमण प्रतिबंध, निष्काषीत व फिर्याद दाखल करण्याबाबत तसेच सार्वजनिक वापरणातील जमीनी व गायराण जमीनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबत व अतिक्रमणे निष्काषीत करण्याबाबत तसेच, जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या व ग्रामपंचायतिच्या ताब्यातील खुल्या जागा व इमारती यांचे अतिक्रमणापासून रक्षण करण्याबाबतचे परिपत्रकांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, गावक–यांच्या सार्वजनीक वापरासाठी ग्रामपंचायतीकडे निहीत केलेल्या जमीनी तसेच गायराण जमीनीवरील अतिक्रमणाबाबत मा. सर्वोच्य न्यायालयाने सिव्हील अपिल क्रं.११३२/२०२१ एस.एल.पी.(सी) ३१०९/२०११ जगपालसिंग व इतर वि. पंजाब राज्य व इतर या याचिकेमध्ये नोंदविलेले निरिक्षण व आदेशाची पूर्तता करण्याचे संबधीतांना सुचविलेले आहे. त्यामध्ये, शतकांपासून गावाच्या ताब्यात असलेल्या सार्वजनिक वापरातील जमीनी (common village land) व गायरान जमीनी गावक–यांच्या विविध उपयोगात आहेत. जसे गुरांना पाणी पिण्यासाठी, धुण्यासाठी तलाव,

हंगामाचे धान्य साठविण्याची जागा, पाणंद रस्ते/वहिवाटीचे रस्ते, पिक मळणीसाठी, मनोरंजन, सर्कस, रामलिला इत्यादी साठी मैदान, बैलगाडया स्थानक, जलस्त्रोत, मोकळी जागा व स्मशानभुमी, दफनभुमी इत्यादी प्रयोजनासाठी गावाच्या ताब्यात होत्या. या जमीनीची मालकी स्थानीक कायदयानुसार शासनाकडे होती. मात्र स्वातंत्र्यानंतर समाज कंटक लोकांनी बाहूशक्ती, जनशक्ती व राजकिय शक्तीद्वारे मोठया प्रमाणावर सार्वजनीक जमीनी हडप केल्याचे आढळून आले आहे व अशी अतिक्रमणे खुप कालावधीपासूनची आहेत किंवा त्यावरील बांधकाम प्रचंड खर्च करण्यात आला आहे अश्या कारणास्तव कोणत्याही अतिक्रमणास संरक्षण देवू नये तथा अशी अतिक्रमणे नियमानुकुल करण्यात येवू नये, असे आदेशीत केलेले आहे.

१३. मा. सर्वोच्च न्यायालयाने जगपाल सिंग वि. पंजाब राज्य, सिव्हील अपिल नं. ११३२/२०११ मध्ये परिच्छेद क्रं. २२ मध्ये असे निष्कर्ष दिले की, “Before parting with this case we give directions to all the State Governments in the country that, they should prepare schemes for eviction of illegal/unauthorized occupants of Gram Sabha/ Gram Panchayat/ Prramboke/Shamlat land and these must be restored to the Gram Sabha/GramPancayat for the common use of villagers of the village. For this purpose the Chief Secretaries of all State Governments/Union

Territories in India are directed to do the needful, taking the help of other senior officers of the Governments. The said scheme should provide for the speedy eviction of such illegal occupant, after giving him a show cause notice and a brief hearing. Long duration of such illegal occupation or huge expenditure in making construction thereon or political connections must not be teated as a justification for condoning this illegal act or for regularizing the illegal possession. Regularization should only be permitted in exceptional cases e.g. where lease has been granted undr some Government notification to landless labourers or members of Scheduled Castes/Scheduled Tribes, or where there is already a school dispensary or other public utility on the land"

१४. वादीच्या वकिलानी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे Tukaram L. Nagthane Vs. Grampancyayat Karyala, reported in 1988 (3) Bom.C.R. 351 या निकालाचा अहवाल दिला. मी सदर निकालाचे अवलोकन केले. त्यातील वस्तुस्थिती व परिस्थीती ही प्रस्तुत प्रकरणाच्या वस्तुस्थिती व परिस्थिती पेक्षा भिन्न आहे. याउपर मा. सर्वोच्य न्यायालयाने उपरोक्त न्यायनिर्णयामध्ये तसेच महाराष्ट्र शासनाने गायरान/गुरूचरण व गावाच्या सार्वजनीक वापरातील जमीनीवरील अन्यप्रयाजनासाठी झालेली अतिक्रमणे अथवा अनाधीकृत

बांधकामे फार जुनी असली तरी ते निष्काषीत करण्याचे आदेशीत केलेले आहे. त्यामुळे मी नम्रपणे नमुद करू इच्छीतो की सदरील न्यायनिर्णय या केसला लागू होत नाही.

१५. वर नमुद केल्याप्रमाणे वादी किंवा त्यांचे पूर्वज हे दावा मिळकतीचे मालक होते याबाबत कोणताही सकृतदर्शनी पूरावा नाही. याउलट वादीचे गुरूचरण जमीन मिळकत स.न. ८४/१ वर अतिक्रमण असल्याचे सकृतदर्शनी दिसते. त्यामुळे वादीस सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने नाही. अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार नाही. म्हणून मी मुददा क्रं. ०१ ते ०३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे. वादी मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यास पात्र नाही म्हणून मी मुददा क्रं. ०४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे. वादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. करिता, मुददा क्रं. ५ साठी खालील आदेश देत आहे.

## **आदेश**

१. नि. क्रं. ०५ चा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ.

३. अर्ज खुल्या न्यायालयातुन घोषित करण्यात आला.

ANIL RAMKRISHNA GUNNAL

Digitally signed by ANIL RAMKRISHNA GUNNAL
Date: 2022.11.15 14:32:57 +0530

(अनिल रा.गुन्नाल)

दिनांक १५/११/२०२२ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल.